म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 823
२२न - १९०८

प. नं. काव्य २४८

# [प]वनप्रकोप.

( १–६–८२ )

हें काव्य

**एकनाथ गणेश भांडारे,**

मॅार्स सिम्लर, जी० आय० पी०,
रेल्वे स्टेशन जबलपूर,
ह्यांनीं रचिलें.

तें

नागपूर येथें,

'[...]' छापखान्यांत [...] छापिलें

नं. २०४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
संग्रहालय क्रमांक 823
लेखक ए. ग. भांडारे
सन १९०८
पुस्तकाचें नांव पवनप्रकोप
823

# समर्पण.

राजमान्य राजश्री

## विठ्ठल भगवंत लेंभे.

ह्यांस

( श्लोक. )

काव्यार्णवांत बुडि मारुनि दीर्घ यत्नें
जीं काढिलीं परम सुंदर पद्यरत्नें;
त्यांचे सुदाम करुनी नमुनी पदांस
मी अर्पितों रसिक मित्रवरा! तुह्मांस.

नम्र सेवक

एकनाथ गणेश भांडारे

# प्रस्तावना.

काव्य करावें स्यां नच, वचकावें दूषितां परी लघुस
कां न सदन बांधावें, कीं त्यांत बिळें पुढें करील घुस.
मोरोपंत.

माझी पहिली कृति कामकंदला. तिची अवस्था पाहून द-
ार्द्र झालेला जो माझा मित्रजन, त्याच्या कृपेचें फल हें पवनप्र-
ीप काव्य.

स्वैर विहारिणी जी माझी बुद्धि, तीस मोठ्या कष्टानें आ-
ळून परिणत करण्याचा ज्या मित्रांनीं प्रयत्न केला त्यांचे प्रकृत
थलीं उपकार मानणें अवश्य होय. तथापि कामकंदलेंत हात न
तांही ज्यांनीं मोठ्या उदारतेनें खलनिंदा सहन करून माझें दुःख
लकें केलें व वारंवार मला धैर्य दिलें, त्या माझ्या सन्मित्राचें ह्म-
जे रा. रा. शंकर गणेश देशपांडे, बी० ए०, ह्यांचें विशेष उप-
ारी होणें अत्यंत महत्वाचें होय.

कामकंदलेवर ज्या टीका झाल्या, त्यांपैकीं विविधज्ञान वि-
ारांतील टीकेपासून माझें फार हित झालें; हें मी प्रांजलपणें क-
ल करतों. ह्मणून त्या टीकाकाराचे जेवढे उपकार मानावे तेवढे
ोडेच वाटतात. बाकी इतर भिकार पत्रांत 'कामकंदलेवर टी-
ा' ह्या टोपण नांवानें जो छल झाला त्याचा उल्लेख करणें ह्म-
जेच छलकांस मान देणें होय. ह्मणून तसें न करतां येथें येवढें-
कळवितों कीं अघोरघंटाच्या तावडींत सांपडून जशी मालती-

ची स्थिती झाली, तशी ह्या अघोरघंटाच्या तडाक्यांत माझ्या बु
द्धीची स्थिती न होतां तिनें हें फळ दाखविलें ही गोष्ट मी मोठ्या
भाग्याची समजतों !

आपले लोकप्रिय कवि श्रीमंत गणपतराव हरिहर पटवर्धन
ऊर्फ बापु साहेब कुरुंदवाडकर ह्यांनीं हें काव्य वाचून मला यो
बक्षीस दिलें, ह्यामुळें मी त्यांचा तर उपकारी आहेच, पण ह्या र
च्या कृतीनें त्यांचें आपल्या महाराष्ट्र भाषेवर किती प्रेम आहे
हज व्यक्त होतें. श्रीमंत बापुसाहेब कुरुंदवाडकर, ह्यांसारखे रा
काव्य गुणज्ञ व उदारधी प्रभु असले ह्मणजे माझ्या सारख्या बा
कवीची अल्लड रसना नटी सालंकृत होऊन नृत्य करण्यास न
द्युक्त होणार नाहीं ? अस्तु.

रा० रा० हरी महादेव पंडित, यांनीं ह्या काव्याचीं
प्रुफें प्रसंगवशात् तपासून देण्याची तसदी घेतली, ह्मणून
चा फार आभारी आहे.

काव्य रचण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. ह्मणून ह्यांतल्या
वांकडे कडक दृष्टी न देतां रसिकांनीं ह्यावर कृपादृष्टी ठेवावी;
त्यांस माझी विनंति आहे.

जबलपुर,
ता. १–३–८७ } ० ग० भांडारे

# नमनश्लोक.

जेणें हें रुचिर अनंत विश्व केलें
आश्चर्यांबुधिकरुनी तुडुंबलेलें!
प्रेमें जो जतन करीतसे तयाचें
वंदूं या मृदुपदयुग्म त्या प्रभूचें 1.

यद्वाणी श्रवण करून ईश्वराच्या
त्या साऱ्या कृति भरती मनांत साच्या;
कोणीही मनिं नुरवी अहंपणातें
भावें त्या नमन करूं सरस्वतीतें 2.

यत्कीर्तिध्वज फडके सदा जगांत
होती यत्कृति चिर नूतन प्रभूत;
यत्संगें मधुर गिरा करी विलास
वंदूं त्या कविवरवृंदसत्पदांस 3.

वंदीं मी विमलमनें गणेश ताता
तैशी ती प्रियतम मंगला सुमाता
सन्मित्रत्रयपद वंदुनी सुदिव्य
मी गातों मम पवनप्रकोप काव्य 4.

का० य
११२
का.ग्रं २०४
मराठी ग्रंथ संग्रहालय
१००

# पवन प्रकोप.

—:0:—

## साक्या.

प्राची पश्चिम आशा* व्यापुनि, पसरे पर्वत एक
ज्याच्या शाखा दूरवरी त्या, गेल्या हो! वहुतेक १.
कैलासासम धवलतमाभें,× दिसतो जो रमणीय
हिमाचलाची पूर्ण प्रतिमा, वाटे गिरि तो होय २.
सुरललना१ खोऊन पचंगा, तिरकमटा घेऊनी
तेथें येती मृगयेसाठीं, वधिती त्या मृग बाणीं ३.
भरजरि विजयध्वज फडकतसे, दुर्गावरी† देवांचा
वज्रासम तो दृढतम आहे, कोट खरोखर त्याचा ४.
सातपुडा त्या नाम गिरीचें, ऋषि तप करिती जेथें
अशिरगड असें एका शिखरा, आहे नाम अहो! तें ५.
जेथें तुटले कडे भयंकर, तेथुनि सरिता घेई
उड्या धडाधड आणि चंचला, गतिनें वाहत जाई ६
गिरिशिखरांहुनि धों धों धों धों, तीचें जल पडतांना
रविकरयोगें इंद्रधनुच्छवि, दावितसे नेत्रांना ७

---

*दिशा. ×अतिशुभ्रकांतीनें. १देवांगना. †किल्ल्यावर.

ते दिन ग्रीष्मर्तूचे होते, ऊष्मा होत अपार
सायंकाळीं रानोरानीं, दिसते फार बहार ८.
तरुचीं पर्णें गळुनी पडतीं, भूमीवर तीं सारीं
पादपरूपें वृद्धर्षी जणु, तप करिती कांतारीं ९.
सगळें अंबर* नीळें झालें, दगही अस्ता गेलें
कालकूटधर सागररूपें, नभ हें उदया आलें १०.
किंवा कमला चुरिते ज्याचे, शेष मंचकीं पाय
वाटे त्या विष्णूची कांती, श्यामा सुंदर होय ११.
सातपुड्यावर झुळझुळ वाहे, सायंकाळीं वारा
हरुनी स्वेदा† त्वरितचि देई, विश्रांतीला थारा १२.
त्याच गिरीहुनि सुक्ता नामें, खळखळ सरिता वाहे
जीचे पुलिनीं हंसश्रेणी¶, स्वच्छंदें रमताहे १३.
ह्या सरितेच्या तटीं पवनही, मंदमंद अति वाहे
मधुर जलानें पूर्ण असे खरी, परम रम्य सरिता हे १४.
वृक्षांखालीं मृगिचीं बाळें, बसतीं रंवथ करीत
वनगाईचीं वत्सें करितीं, स्तनपानातें तेथ १५.
सुक्तानदिच्या जवळचि आहे, पुर नामें बगमार
ज्याच्या सन्निध सुंदर मंदिर||, एक दिसे बहु थोर १६.
स्फटिकमण्याच्या भिंती ज्याच्या, असतो भव्य विशाल

---

*आकाश. †घाम. ¶हंसांचा कळप. ||येथें स्टेशन समजावें. हें जब-
...वर खांडव्याजवळ आहे.
लपूर लाइन...

नभोवितानी[†]मध्यभागीं जणुं, आश्रय त्यांहीं केला
आनंदाचें मंदिर तें जणुं, किंवा तें मोहर ! १७.
सद्गुण, विनय, प्रेम नांदती, त्या स्थानीं अनिवार
सभोंवतालीं तेथें आहे, अतिसुंदर आराम[‡] १८.
सुगंध जेथें मंदवायुसह, देत मना आराम[¶] १९.
सुंदर रंभा[‖] असती तेथें, फलयुत[$] त्या सुकुमार
निकटचि विलसति अशोक तरुच्या, माला हिरव्या गार २०.
कारंजाचे उडति फवारे, एका मागुनि एक
अवळचि त्याच्या पुष्पितवेली, तरुसह असति अनेक २१.
तरु पुष्पांनीं डवरुनि गेले, गुंजारव मधुपांचे
मकरंदें जणुं तृप्त करिति ते, आतुर कर्णा साचे २२.
जाइ, जुई, मालती, मोगरा, गुलाब शेवंती तें
पंक्तिपंक्तिनें लावुनि शोभा, आणिलि आरामातें २३.
पुष्पांचा भर देखुनि वाटे, तारुण्याची छाया
तरुवल्लीवर पडली आहे, मदन रमे त्या ठाया २४.
चिंव चिंव शद्वकरुनी पक्षी, ईश्वरगुण गाताती
यदृच्छेनें इकडुनि तिकडे, आनंदें उडताती ! २५.
ऐशा रम्य स्थानामध्यें, वाग्देवीचा लाल
माझा विठ्ठल तोषवृत्तिनें, कंठि काल बहुसाल २६.

---

[†]आकाशविस्ताराच्या मध्यभागीं. [‡]बाग. [¶]विश्रांति. [‖]केळी [पक्षीं] अप्सरा. [$]फळी [पक्षीं] बालकें.

परवंशतेच्या नियमित कार्या, सारुनि इतरा कालीं
मंजुळ कवनें रचीत बसणें, तणें वेळोवेळीं ! २७.
अरविंदाच्या मकरंदातच, मधुकर तल्लिन होई
श्रेष्ठ कवींच्या कवनीं असणें, रत तेवीं त्यानेंही २८.

श्लोक.

दिनमणी† धरणीतलिं चालला
अरुणराग तयें झणि पाडला !
गगनमंडलिं मेघततीं* महा
पसरली, सरली सुखवेळ हाऽ ! २९
गगन अभ्रपटें¶ भरलें झणीं
दशदिशा अति शून्यचि होउनी
अखिल दाटलि या जगिं खिन्नता
तुरविते रविते लघु रक्तता ३०
बहुंकडे परि दाटलिसे अतां
अखिल हो ! भुवनत्रायें शांतता
सुवनराजिहि दाविति दैन्यता
अवरिती, वरितीं परि रम्यता ३१
त्वरित होउनि आकुल वादळें
जग रसातळिं जाइल या मुळें
वरिति काळजि मानसिं ही महा

अगम¦ते गमतें सकलां पहा! ३२.
मग अशा समयीं मम विठ्ठलें
कवन हो करुणात्मक वाचिलें
बहुत तन्मय दुःखित जाहलें॥
जग तया 'गत' या सम भासलें! ३३.
चमचमा चमकूं मग लागली
हळुहळू चपला९ नभमंडलीं
बघुनि तत्तनया गाणि* सांकडें※
चपळ ते पळते जनकाकडे+ ३४.
दडुनि तत्कुशीं बोलत सुंदरा
प्रथम वाळवि तूं मनिच्या डरा÷
बघ हळू तिकडे! भयपीडिता
सुवनिता वनिं तापुनि ये अतां ३५.
नयनिं आणुनि अश्रुंस तों निकी†
पुसित त्यांप्रति ते चपलासखी‡
करुणमूर्तिच हो! जणुं पातली
विकळ ते कळतें अति जाहली ३६
पूर्णेंदुतुल्य‖ मुख त्या चपलासखीचें

---

¦वृक्ष. ९वीज. *मानी. ※संकट. +विठ्ठलाकडे. ÷भया. †सुंदर. ‡तार. हीवर स्त्रीची कल्पना करून नांव 'चपलासखी' ठेविलें आहे. ‖पौर्णिमेच्या चंद्रासारखें.

जें होय हो! मदनमंगलधाम¶ साचें
उत्फुल्लपद्मसम* सुंदर नेत्र देती ३७.
शोभा मुखास अतुला, सुषमा७ किती ती!
[illegible]
बिंबोष्ट कोमल जयां बहु शोभवीती!
आरक्त कंठ विलसे कमलाननेचा
ज्यांतून पीक विलसे आणि तांबुलाचा! ३८.
भासे तिचें शरिर नाजुक हेमवल्ली
राहे गुलाबकुसुमासम लालि गालीं
अलंकृता, गुणवती, रसपूर्णपात्रा
प्रत्यक्ष होय कमला मृदु चारुगात्री ३९
पद्मांतरंगसम$ सुंदर नाभि* तीची
रोमावली× बहुत शोभवि तीस साची
रक्तोत्पलासम÷ तिचे कर दोन्हि होत
जे कंकणां+ खचित शोभविती प्रभूत ४०
उत्तुंगपीनकुच† वर्तुल राजसेचे
जे होय वैभव जणों रतिच्या पतीचें!
शृंगारमूर्तिच‡ दिसे बहु कोमला जे

---

¶घर. *फुलेलल्या कमलासमान. ७कांति. $कमलाच्या अंतरंगा-प्रमाणें. *बेंबी. ×लव. ÷कमलासारखे. +बांगड्या. †पुष्ट व वाढ-लेले स्तन. ‡शृंगाररसाची प्रतिमाच.

सौंदर्यसागर जिला बघतांच लाजे! १
नीलारविंदसम सुंदर कुंतलाच्या§
वेणींत जातिकुसुमें विणिलीं जयेच्या
रंभोरु‖ पातलि अशी चपलासखी ते
नासीक सुंदर जिचें अति नीट होतें १२.
मुक्तासरत्रुटित$ ओघळतात मोत्यें
ढाळी तसे टपटपां नयनाश्रु हो! ते
दुःखाश्रुनीं स्तन तिचे सगळे भिजून
गेले तरी तिजशिं शद्बहि बोलवे न!
जात्या* असे हृदय कोमल फार ज्याचें
प्रेमें तशांत अति लोलुप होइ साचें
त्या विठ्ठलें बघुनि त्या चपला सखीची
ऐशी स्थिती; वदत तो मृदुवाणि साची १४.
हे सुंदरी! कनकचंपकवर्णगौरी!¶
कां आणिशी वरिवरी नयनांस वारी‖?
झाला तुझा पदर सुंदरि! सर्व ओला
गे! घाम फार तुज दर्दरुनीच आला! १५.
ही थाटली तव तनूवर रोमराजी†

§केसांच्या. ‖कर्दळीच्या गाभ्याप्रमाणें मांड्या आहेत जिच्या. $तुटलेला मोत्यांचा हार. *स्वभावतः. ¶सोनचाप्याप्रमाणें जिचा वर्ण गौर. ‖पाणी. †कांटे.

कांपूं नकोस तनये! थरकून आजीं
कां दाटतो बरिवरीं तव कंठ बाले!
गे! काय बाइ! तुजला तरि आज झालें? ४६.
निश्वास[1] टाकिशि वरिवरि कां रसाले!
कां लाल कोमल तुझें मुख आज झालें?
आतां पुरें कर! पुशी नयनाश्रु बाले!
खेदें पुसून तव कुंकुम सर्व गेलें! ४७.
वेणी तुझी उकलुनी गळतीं फुलें हीं
तीं सांवरी सुतनये! तुज भान नाहीं!
गे! ऐकु दे! रव मला तव मंजु साचे
ही स्तब्धता त्यजुन वृत्त कथी सुखाचें! ४८
ऐकूनियां मधुर हो! रव विठ्ठलाचे
तल्लीन होय मन त्या कवितावधूचें!
तेव्हां हिचें मन जरा स्थिर कां न व्हावें?
शोकार्णवीं[2] न तरि कां इवलें शमावें? ४९.
ऐका तिची सुरस कोमल मंजु वाणी
जी ऐकतां परभृता[3] मनि लाज आणी
ती बोलतां झळकती शुचि[4] दंतपंक्ती
ज्यांशीं बळें हिरकण्या उपमेय होती! ५०
' ये वर्तमान कथनोद्यम या कपाळा

---

१ उसा. १श्वास. २शोकसमुद्रांनीं. ३कोकिळा. ४शुभ्र.

झालें तयें परम निर्दय मी दयाळा!
कोणास मी† दुखवितें ‡दयितावियोगें
कोणास मी रडवितें सुतशोकवेगें ५१.
आनंदयुक्त ललना‡ असतां स्वगेहीं
दुर्वृत्त‖ तीस कथण्या मज लाज नाहीं!
वैधव्यशस्त्र हृदयांतरिं खोंचुनीयां
केल्या क्षणांत विकला अति दीन बाया! ५२.
सांगूनियां मरणवृत्तहि तान्हुल्याचें
म्यां फाडिलें हृदय वत्सलमाउलींचें!
बंधू मरो, सुत मरो, जननी मरो ते,
सारे अनर्थ कथणें मज भाग येतें! ५३.
ऐशा अनर्थकर वृत्तिस म्यां वरीलें
माझें कठोर मन भग्न न हाय! झालें
मी वाचव्यें अति भयंकर वृत्त तूतें
सांगावया; मरण त्याहुनि थोर बा! तें' ५४.
बोले सती 'कथिन सर्वहि वृत्त तूला
जें आज ये विधिवळें कथणें कपाळा!
झाली भयंकर निशा घनसंचयानें§
सारी अफाट धरणी भरली तमानें! ५५.
काळे जसे असति कुंतल सुंदरीचे

---

†चपलासखी. ‡स्त्री. ‖पतीची मरणवार्ता. §मेघसमुदायानें.

किंवा जसे असति पर्वत कज्जलाचे
तैसे नभांत जमले ढग त्या निशींत
आकार ज्यांस असतो करिचे† प्रमत्त‡ ५६.
पाहूनियां घन असे गगनांत थोर
जे गर्जना वरिवरी करिती अपार
तों तत्क्षणीं दचकुनी करिराजवैरी*
हाणी नखाग्र, अति चंडशिला विदारी! ५७.
मारी उड्या समजुनी करि केसरी ते$
भूमीवरी दणण आपटि लांगुलातें
रागें करूनि गुरु गर्जित भी वना दे
ज्याच्या प्रतिध्वनि भरें गिरिगर्भ कोंदे ५८.
जशि जशि रजनी ते चालली फार होत
जमति तसतशा त्या मेघमाला नभांत!
गिरि, तरु, तमिं|| गेले लोपुनी त्या निशींत
जल, जग, नभ यांचा कांहिं लागे न अंत! ५९.
उकलिलि रजनीनें बाइ! वेणी करानें
त्वरित कसुनि काळ्या अंबरातें* तियेनें
स्तनयुग मग काळ्या कंचुकीनेंच झांकी
जणु वनपतिसंगें जात ती खेळण्या कीं! ६०.

---

†हस्तीचे. ‡ हें 'करि' चें विशेषण. *सिंह. $.वन ¶अरण्यांत.
||अंधारांत *वस्त्रातें.

म. काव्य 285



रजनि युवति गुंफी हार नीलोत्पलांचा
जलधरपतिकंठीं घालण्यातेंच साचा
जवनपवनयोगें येइ चांचल्य तीतें
विपुल कलुषता ये सर्व सुक्तावनातें! ६१
भरभरभर वारा लागला वाहुं जेव्हां
धडधड पडताती भूतळीं वृक्ष तेव्हां!
सकल जगति दाटे मृत्तिकेचाच लोळ
गिरिहुनि रिचताती चंड पाषाण खोल! ६२.
सरर सरर येती थोर[1] पर्जन्य धारा
सणणण शरवृष्टी होत जैशा अपारा!
कडडडडड गर्जे बाइ! विद्युल्लता ती
धडडड पडलेली ऐकू येई दिगंतीं! ६३.
दुथडि भरुनि जाती तैं नद्या कांहिं कांहीं
गररर फिरताती ज्यामधें भोंवरें ही!
धवधवधव शब्दें धब्धबे ऐकु येती
परिसुनि रव सारें मानसीं थक्क होती! ६४.
प्रलयसमयिं ऐशा चाललें वन्हियान+
बघुनि जव* जयाचा वायु ही होय दीन!
सकल जग तयाच्या कोंदले गर्जनेनें
थर थर थर कांपू लागलें मी भयानें! ६५.
अति कलुषित वायू होउनी त्याच वेळीं

---

[1]मोठाल्या. +आगगाडी. *वेग.

डळमळवि अहा! ती कुंभिनी अंतराळीं!
स्फुरण वरुनि तेणें चंडशीले समान
धड धड धड येई धांवुनी अन्ययान!+ ६६
हर! हर! हर! ऐशीं भेटलीं दोन्हि यानें!
त्रिभुवन तइं कोंदे थोर कोलाहलानें!
सकल जगतिं हाहाःकार दाटे अहाहा!
क्षणभर गमलें कीं लोक जातो लया हा! ६७
होतां होतां शांत कल्पांत झाला
हा! हा! भंगा पावली यानमाला!
राशी तेथें पर्वतप्राय होई
पाहूनी जी भान तेव्हांच जाई! ६८
झाले प्राणी आंतले छिन्नभिन्न
कित्येकांनीं स्वर्गि केलें प्रयाण!
यानांतूनी चेंडुसे ऊसळोन
कांहीं झाले भूतळीं प्राणहीन! ६९
कांहींकांना धुग्धुगी मात्र राहे
त्यांचा तेथें काळ तो वाट पाहे
अंतीचे ते बोल ऐकूनि कानीं
नेत्रांतूनी खळ्खळां येइ पाणी¶! ७०

---

+दुसरी गाडी. ¶बगमार आणि डोंगरगांव हीं दोन जवळज-
व रेल्वेस्टेशन्स आहेत. ह्या दोन खेड्यांमधून सुक्का नांवाची

साक्या

एक वदे तो कनकलते परि नाजुक जीची काया
हर! हर! आतां मजवांचुनि ती काय करिल मम जाया*. ७१.
मी नसतां जी गुणवति माझी, दर्पण करिं घेवोनी
सुंदर निज मुखकमला, लीलें बघत नसे जाऊनी. ७२.
वेणिफणीही घालित नव्हती, विरहावस्थेमाजीं.
अश्रुजलातें टपटप ढाळित, बसत असे सखि माझी. ७३.
मम मरणातें अवचित परिसिल, दयिता माझी जेव्हां.
दचकुनि हंबरडा फोडुनियां, पडेल मूर्छित तेव्हां. ७४
ऐसें वदुनी आठवुनीयां, मातापितरें गेह.
अकपट मित्रां वाणुनि अंतीं, वरिवरि पावे मोह*. ७५.

---

नदी वाहते. त्यामुळें तेथें मार्ग बराच सखल आहे. बगमाराहून ( प्रलयसमयीं ऐशा चाललें वन्हियान. ) एक गाडी निघाली व कांहीं वेळानें पवनप्रकोपास आरंभ झाला! तिकडे डोंगरगांवास एक डबा उभा होता. त्यांतही कांहीं बायकामाणसें होतीं. ह्या पवनप्रकोपानें त्यांसकट तो डबा बगमाराकडे भडकला! [ धडधड धड येई धाउनी अन्य यान. ] तों त्याचो व त्या गाडीची सुक्ता नदीजवळच टक्कर होऊन आंतील बायकामाणसांचा चुराडा उडाला; हें ह्या काव्याचें मूळ कथानक. काव्यनायक रा. रा. विठ्ठल भगवंत लेंभे हे तेव्हां बगमारास स्टेशनमास्तर होते. *स्त्री-
*मूर्च्छना.

जैसा जैसा अंतक[1] जवळीं, येई त्या प्राण्याच्या
तैशा तैशा आठवती त्यां–प्रति लीला भार्यांच्या! ७६.
संसारामाधें दंग सदां जे, अंतकाळिंही ज्यांना
स्मरण विभूचें झालें न तरी, मुक्ति कशाची त्यांना? ७७.
तडतड तिडका सोसुनि शेवटिं, सोडी एक प्राण!
दुजा वदे तों स्वस्त्रीलागीं; दुःखें करुनी दीन! ७८.
मत्प्राणेश्वरि! मजवर रुसुनी, कां स्वर्गा जातेस?
निजमनिंचें मार्दव वज्रासम, कठिण कसें केलेंस? ७९.
अगे सखे! तूं गुलाबकुसुमा–सम सुंदर होतीस
परि आतां तूं पांडुरवदना, होउनियां पडलीस! ८०.
बिंबाधराची लाली सखये! मातिस आज मिळाली!
पंकजनयनां मिटवुनि पडलिस, धरणीवर ह्या काळीं! ८१.
ग्रंथि[2] प्रेमाची त्या विधिनें, दृढतम बांधिलि होती
मद्दुर्दैवें एकाएकीं, आज कशी सुटली ती? ८२.
त्वत्प्राणाची ज्योती गेली, निघुनी शरिरांतूनी
तथापि मजला जाळित आहे, सखये! तीच अजूनी! ८३.
नाथ तुझा त्वत्सन्निध असुनी, अनाथ झालिस हा! हा!
विरहाग्नीनें काळिज जळतें, देह जळे न परि हा ८४.
त्वन्मरणा परिसुनी कोकिला, कलकल रव करतील
शशिबिंबहि गे! प्रभा आपली, धवल बहू फांकील ८५.

---

१ काळ २ गांठ.

जिच्या सुवासें मधुकर तल्लिन, होउनि घालिति रुंजी
जिचीं सुवासिक कुसुमें घालित होतिस वेणीमाजीं ८६.
त्या मालतिचीं कुसुमें आतां, तुजवरि गे! वाहीन!
खळखळ अश्रुजलानें नंतर, यथेच्छ तुज न्हाणीन! ८७.
तुजवांचुनियां असार झाला, माझा गे! संसार
मदनाच्या त्या सौंदर्याचें, नष्टच झालें सार! ८८.
त्रिभुवनसुंदररत्नाचि नेलें, हरुनी निर्दय काळें
ज्यातें बघुनी सफल मुळीं हे, नेत्र न अझुनी झाले! ८९.
कांहीं बाला वदाति अगाई! येथें कोठें आले?
कोठें बाई! जिवलग माझे, टाकुनि मजला गेले? ९०.
हुडकूं कोठें ह्या ब्रह्मांडीं, प्राणसख्या मी देवा?
जाऊं कोठें? पाहूं कोठें?, मद्भाग्याचा ठेवा? ९१.
दुर्भाग्यी मी पापिण बाई!, अपराधी देवाची!
मन्नाथाची भेट ह्मणूनी, अंतरली मज साची! ९२.
दुःखें मद्भागत होउनि ते, पडली तैशी मागें
रंभा जैशी उलथुन पडते, भूतलिं वायूवेगें! ९३
गडबड लोळति धरणीवर त्या, कांतावियोगें बाला
मळती तेगें पीनस्तन ते, त्यांचे वेळोवेळां! ९४.
कनकलतेला जेवीं साजे, सुंदर फल सुकुमार
तेवीं कोणी घेउनि बाळें आक्रंदति आनिवार! ९५
माझ्या बाळें मोरामागें, रांगत रांगत जावें

धरूनि पिसारा सुंदर त्याचा, खदखद बाइ! हंसावें! ९६
माझ्या मांडीवरतीं बघुनी, वस्त्रें मळविणार
पुनरपि आतां सुत कैचा गे, मजलागीं मिळणार, ७९
मी इतकी दैवाची कोठें, सत्पुत्रा लाधाया?
स्फुंद स्फुंदुनि पदर धरूनी, जो मागे स्तन प्याया. ९८
परिसुनि त्यांच्या करुणोद्गारा, सरिता धबधब शद्वें
अंतःकरणामाजीं द्रवुनी, रडातिल नाना अद्वें[1]; ९९.
एकाकाळीं ऐशीं ऐशीं, परवशता दैवीनें
भक्षियलीं ह्या आर्याभूचीं, बाळें क्रूरपणानें; १००
साक्ष तयाची सरिता ऐशी, देतिल या कल्लोळें
त्याचे त्याचे नयन दाटातिल, अश्रूंच्या उल्लाळें; १०१
होउन भयभीता वनगाई, टकमक बघया झाल्या
हंबरडे फोडुनि तन्नयनीं, धारा खळखळ आल्या; १०२
स्तनपानातें विसरुनि सारीं, [2]वत्सें स्तब्ध जहालीं
हंसश्रेणी भयें ओरडू, लागलिसें त्या कालीं; १०३
एवम् त्या वनिं आक्रोशानें, [3]गुरु कोलाहल होई
तेणें वाटे रडतें वन तें, द्विगुणित त्या पेक्षांही; १०४

श्लोक.

---

१ वर्षें, २ वांसरें, ३ मोठा.

हळुंहळुं जलवृष्टी जाहली बंद जेव्हां
वितळुनि ढग जाऊं लागले सर्व तेव्हां;
झुळझुळ पवनानें कुंज तें हालुं लागे
अमृतसुकण येऊं लागले अंशुमार्गें; १०५.
रजनि युवति सोडी कृष्णवस्त्र त्वरेनें
शशिकरपट तेव्हां नेसली आवडीनें;
वदनिं अलक[1] होते पातले जे श्रमानें
अवरुनि तइं बांधी सुंदरा[2] ते करानें १०६.
स्वकरिं धुवुनि अंभें पूर्व दिग्वक्त्र[3] हो! तें
अरुण अरुण संध्याराग लावी तयातें[3];
शशितिलकहि लावी भद्रकारी कपाळीं;
रजनियुवति ऐशी तेधवां सज्ज झाली १०७.
अखिल जग जहालें स्तब्ध त्या यामिनींत
त्रिभुवनभर हूंचूं कांहिं कोठें न होत;
प्रियकर विरहानें चक्रवाकीच मात्र
रडत रडत तेथें घालवी सर्व रात्र; १०८.
मग अतिशय होई मंद सुक्ताप्रवाह
पवन अचल होई आणि सेवी स्वगेह;
जलचर सरितेच्या कांठिं बैसून कांहीं
श्रवण कटुरवांनीं कोंदवीती मही ही १०९.

---

१केस. २रजनीयुवति. ३पूर्वदिशारूपवदनास.

जगतिं, सकळ ज्यांचे भोग गेले सरून
रडुन रडुन झाले सर्व ते श्वासहीन!
करपद पसरूनी नेत्र घेती मिटूनी
हर! हर! हर! सारे चालले भू त्यजूनी! ११०.
ज्यांना होती धुग्धुगी थोडकीसी
शोकें झाल्या यातना यज्जिवांसीं
कासावीस प्राण जों होति त्यांचे
घेवोनी ते काळ तो जाइ साचे; १११.
आधीं होतें जाहलें विश्व शांत
त्याही माजीं होइ कोलाहलांत[1];
तेणें वाटे स्थान तें सर्व शून्य
औदासीन्यें दाटलें तें अरण्य; ११२.
आतां तेथें चांदणें थंड गार
पर्जन्याचें नीर आहे अपार;
वृक्षश्रेणी मेघ चुंबी महान
वाटे जागा ती परंतु भयान;' ११३.
ऐकूनी हे बोल विद्युत्सखीचे[2]
हलावे हो; चित्त त्या विठ्ठलाचें
बोले बाई दाव तें स्थान मातें
आलें दैवीं माझिया पाहण्यातें[3] ११४.

---

१ कोलाहलाचा शेवट २ चपला सखी. ३ परवशतेमुळें

कष्टें गेली घेउनी विठ्ठलातें
दावायातें स्थान विद्युत्सखी ते
देखावा तो पाहुनी थक्क होई
झाले दोघे मग्न कारुण्यडोहीं! ११५.
वदनकमल झालें म्लान त्या सुंदरीचें
तनुवरि थरकूनी येति कांटे भयाचे;
नयन सजल झाले, कंठ दाटून आला
थरथरथर लागे ओंठ कांपावयाला! ११६
हृदयिं धडकला जैं जाळ शोकानलाचा
चरकन करपे तैं अंतरात्मा तियेचा;
नयनिं भरुन त्याचा धूम्र दुःख प्रकोपें
झर झर झर जाऊं लागला अश्रुरूपें. ११७.
टप टप पडतांना अश्रुधारा प्रभूत
प्रति धनु दिसुं लागे इंदुचें बिंब भ्रांत
शशिमुखिमृदुकंठीं तेधवां रम्य थोर
धवल विलसु लागे अश्रुचा चंद्रहार! ११८.
आति भरति तियेच्या आलि शोकांबुधीला
अहह! तशिच आली स्तब्धता वैखरीला!
बहुत विकल झाली, मूर्छना तीस आली
धडडड पडतां ती विठ्ठलें सांवरीली! ११९.
वामा विद्युत्सखीनें करुनि विनवण्या आणिलें ज्या स्वसंगें
दुःखें होतें जयाचें मन कळवळलें साच या दुष्प्रसंगें!

बाष्पें आलीं भरोनी नयनकमलिं त्या विठ्ठलाच्या प्रभूत
पाहूनी तीस मूर्छागत अवचित तो मोहुनी जाइ तेथ १२०
आतां तेथें न कांहीं हर हर उरलें स्तब्ध ते वाचुनीयां
आनंदाचें अहाहा! वसतिगृह असे रम्य हो! जें जगीं या!
या आतां सर्व जाऊं सुरसिक वर हो! पाहुं त्या सद्मनातें
उत्कंठा पूर्ण घेऊं त्वरित करुनियां आणि येऊं गृहातें १२१
पृथ्वीच्या मानदंडासम गिरि पसरे लांबच्यालांब थोर
जेथें धों धों रवानें सरमर सरिता वाहताती अपार
सृष्टी सौंदर्य मोदें सुरवर बघुनी जाहले तुष्ट जेथें
भासे आतां अहाहा! किति तरि परि हा शून्य हो! प्रांत येथें? १२२
दुर्दैवें सर्व गेलीं रविसुतसदनीं बालकें भूसतीचीं
काळानें तीच केली स्थिति शशिवदना हाय! विद्युत्सखीची!
जेव्हां दुःखप्रकोपें गृहिं परतलि ती मूर्ति मद्विठ्ठलाची
तेव्हांपासून कैची चिलबिल वनिं या अंडजा जारजांची? १२३
भृंगांचे संघ होते कमलिनिवर ते गुंजि घालीत जेथें
आलिंगूनी उराशीं कुसुमित सुलता वृक्ष मोदांत होते!
तच्छाखा मंदवातें इकडुनि तिकडे हालत स्वैर होत्या
पक्ष्यांच्या येथ वाचा चिंवचिंव मधुरा जाहल्या बंद हो! त्या १२४.
पाण्याचे लोट मोठे गिरिहुनि रिचती धड्धडां भूवरी ते
ओढे होऊन त्यांचे खळखळखळ ते वाहती शीघ्र येथें!
त्यांच्या तुंगप्रवाहें कलकल उठुनी चंड पाषाण गेले
दुर्दैवें मोठमोठ्या दराडि ढसळुनी प्राणि कांहीं निमाले १२५.

ज्यांच्या विस्तीर्ण शाखा चहुंकडुनि दिशा व्यापुनी दाट ठेल्या
ज्यांच्या रांगा हजारों जणु कवटळण्या मेघमालेस गेल्या!
ज्यांच्या योगें नद्यांचे नयनसुखकर प्रांत होते प्रभूत
हा! हा! हा! तींच झाडें कडकड पडलीं मोडुनी सर्व येथ! १२६.
आनंदानें वसंतीं पुरुषयुवतिनीं केलि नाना कराव्या
स्वच्छंदें कोकिलांनीं प्रियकर मधुरा रागिणी आळवाव्या!
पुष्पांच्या घमघमाटें भरुन तइं तुझे प्रांत जावेत सारे
ऐसे पूर्वीं सुखाचें कितितरि असशी स्थान तूं हे वना! रे! १२७.
उल्हासाच्या भरानें कितिक युवतिनीं येथ यावें नटूनी;
स्वत्पुष्पांचे असावे प्रियपतिकरितां हार गुंफीत कोणी!
स्वद्वृक्षाखालिं हर्षें कितिक तरुणिनीं बैसुनी आळवूनी
प्रेमाचीं स्वप्रियाच्या असतिल झटलीं रे वना! गोड गाणीं १२८.
ज्यांचीं बालारविंदासम मृदुवदनें होतिं गोजिरवाणीं
नाहीं गोडी कशाला; अमृतरस फिका! ऐशि यन्मंजुवाणी!
ज्यांची लीला बघूनी जनकजननिला होइ संतोष भारी
स्वत्पुष्पें तोडण्यातें असतिल किति बा! पातल्या त्या कुमारी? १२९.
जेव्हां आलीं लतांना अभिनव कुसुमें यौवनाच्या भरानें
पुष्पांचे मोठमोठे मधुयुत फुलले ताटवे तोयदानें[1]
ह्या पुष्पांच्या सुवासें मधुर किति बरें भाळुनी भृंगवृंद[2]

---

१ पावसानें, २ भ्रमरांचे समुदाय.

येथें धांवून आले असतिल लुटण्या रे वना! तन्मरंद?
'आह्मी नांदू सुखानें सतत जगतिं' हा गर्व कोणा नसावा
स्वास्तित्वाचा भरंसा क्षणिक जगतिं ह्या व्यर्थ कोणीं धरावा?
होतें सर्व प्रकारें रुचिर वन पहा! पूर्वि हें सौख्यधाम
काएकीं तयाचा अहह! लय कसा जाहला? राम!! राम!!!

समाप्त.

आर्य

## उपसंहार.

केली म्यां पवनप्रकोप कविता सालंकृता सुंदरा
जी मी सांप्रत अर्पितों सुरसिकां संतोष देण्या जरा.
ब्रह्मानंद मिळो तयांप्रति असे हें मन्मनोवांछित
आतां त्याप्रति पूर्ण शंकर करो; नाहीं दुजें इछित.